# रा.ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय,
# श्रीरामपूर, ४१३ ७०९ जि. अहमदनगर

## कनिष्ठ महाविद्यालय
## माहितीपत्रक २०२० - २०२१

---

**प्रास्ताविक :-**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ तीर्थरूप अण्णा यांचे बहुजन समाजाच्या मुला-मुलींना शिक्षण मिळाल्याशिवाय व समाज एकजिनसी झाल्याशिवाय देशाची उन्नती होणार नाही, असे अनुभवाने त्यांना वाटत होते.

त्यासाठी अण्णांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने दूधगाव व नेर्ले या ठिकाणी शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला. १९१९ मध्ये काले ता. कराड, जि. सातारा येथे वसतिगृह स्थापन करून त्यांनी या कार्याची मुहूर्तमेढ रोवली व संस्थेला ''रयत शिक्षण संस्था'' हे नाव दिले. पुढे संस्थेच्या कार्याचे मुख्य केंद्र श्री. छत्रपतींची राजधानी असलेले ''सातारा'' शहर झाले. १९२४ साली एक हरिजन विद्यार्थी स्वत:च्या घरी ठेवून कर्मवीर अण्णांनी सातारा येथे कार्याची सुरूवात केली. कालांतराने त्याचे रूपांतर धनिणीच्या बागेतील वसतिगृहात झाले. या वसतिगृहाचा नामकरण विधी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हस्ते दि. ०५/०२/१९२७ रोजी होऊन वसतिगृहाला ''छत्रपती शाहू बोर्डिंग'' हे नाव देण्यात आले.

कर्मवीर अण्णांचा पिंड हा समाजसुधारकाचा होता. समाजपरिवर्तनासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे हे त्यांनी जाणले होते. त्यांनी शिक्षणाचे कार्य अंगिकारले व त्यासाठी जीवन वेचले. त्यांच्या शैक्षणिक कार्यात महाराष्ट्राचा चेहरा मोहरा बदलून गेला. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे कार्य मुलगामी होते. त्यांचे शैक्षणिक कार्य त्यामागील तत्त्वे केवळ महाराष्ट्राच्यादृष्टीनेच नव्हे, तर भारतातील शिक्षणाच्यादृष्टीनेही महत्त्वाची व मार्गदर्शक आहेत.

वसतिगृह जीवनावर भर, भारतीय ऐक्य, स्वावलंबन, स्वाभिमान, श्रमप्रतिष्ठा, मानवतावाद, विश्वबंधुत्व त्यागी व सेवामय असे तप:पत त्यांचे जीवन. साधेपणा, जनतेशी एकरूपता, अज्ञानाच्या अंध:कारात पिचत पडले रयतेला नंदादीपाप्रमाणे सतत तेवत ठेवून मार्ग उजळून टाकण्याची शिकवण, अन्यायाविरूध्द बंड करून उठणे. हे सर्व करीत असता पैशामुळे आपले काम केव्हाही अडवून राहणार नाही, हा दुर्दम्य आशावाद. अशा सूत्रमय पद्धतीने कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा आराखडा मांडता येईल. त्यांनी केलेल्या महान शैक्षणिक कार्यामुळे त्यांच्याविविध अंगी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी २२ सप्टेंबर १९८६ ते २२ सप्टेंबर १९८७ हे ''कर्मवीर जन्मशताब्दी वर्ष'' म्हणून साजरे केले गेले.

आज रयत शिक्षण संस्थेच्या वटवृक्षाच्या शाखा महाराष्ट्रातील १४ जिल्हयांमध्ये विस्तारलेल्या असून ६५ पूर्व प्राथमिक विद्यालये, ४३० माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये, ०८ अध्यापक

विद्यालये, ४० महाविद्यालये, ७८ वसतिगृहे, ०७ कार्यालये, ५८ इतर शाखा व ०१ इंजिनिअरिंग महाविद्यालय, ०८ आश्रमशाळा व ०६ आय.टी.आय असून त्यांची एकूण संख्या ७१० आहे.

### ❖ रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर :-

रयत शिक्षण संस्थेच्या शाखांपैकी रा.ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर हे १९६० मध्ये दानशूर कै. रावबहादूर नारायणराव बोरावके यांच्या ३ लक्ष रूपयांच्या उदार देणगीतून सुरू करण्यात आले.

सध्या या महाविद्यलयात विज्ञान शाखांतर्गत पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, गणित, वनस्पतिशास्त्र हे विषय विशेष स्तरावर तर संख्याशास्त्र हा विषय सामान्य स्तरावर शिकविला जातो. पद्व्युत्तर स्तरावर OrganicChemistry, Analytical Chemistry, Computer Science, Maths, Physics, Botany, Zoology या विषयांच्या अध्यापनाची सोय आहे. कला शाखेत इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र व भूगोल हे विषय विशेष स्तरावर तर शिक्षणशास्त्र व मानसशास्त्र हे विषय सामान्य स्तरावर शिकविण्याची सोय करण्यात आलेली आहे. तसेच एम.ए. साठी इंग्रजी, मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल ,राज्यशास्त्र हे विषय शिकविले जातात. अर्थशास्त्र व मराठी या विषयाचा एम.फिल व पीएच.डी. चा अभ्यासक्रम संशोधन केंद्रातून शिकविला जातो. १९७७ पासून संगणकशास्त्र ही नवी ज्ञानशाखा सुरू केलेली आहे. पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, स्पोकन इग्लीश व स्पॉट स्किल डेव्हलपमेंटचे कोर्सेस घेतले जातात.

### ❖ कनिष्ठ महाविद्यालय :-

महाराष्ट्र सरकारने शिक्षणक्षेत्रात नवीन क्रांती करून १०+२+३हा नवीन आकृतिबंध स्वीकारला आहे. त्यानुसार या महाविद्यालयात १९७६-७७ पासून इ. ११वी व इ. १२ वी कला व विज्ञान यांचे वर्ग जोडण्यात आले आहेत. सध्या महाविद्यालयात इ. ११ वी व इ. १२ वी कला व विज्ञान शाखेच्या प्रत्येकी ०४ तुकडया अनुदानीत असून इ. ११ वी व इ. १२ वी शास्त्र वर्गाच्या प्रत्येकी ०४ तुकडया विनाअनुदानीत आहेत. त्याच प्रमाणे H.Sc. Voc अंतर्गत MLD, BM & Dairy Course ११ वी व १२ वी स्तरांवर शिकविले जातात.

### ❖ प्रवेश प्रक्रिया Onlineसुरू केली आहे :-www.rbnbcollege

**अ) इ. ११ कला / विज्ञान :-**

खालील पात्रता असणाऱ्या विद्यार्थ्यांना इ. ११ वी वर्गात प्रवेश दिला जातो.

१. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची इ. १० वीची परीक्षा पास झालेला विद्यार्थी (मात्र शाखा शाखेसाठी गणित व विज्ञान या विषयांमध्ये कमीत कमी ४०%गुण असणे आवश्यक आहे)

२. इतर राज्यातील एस.एस.सी. परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचा पात्रता दाखला सादर केल्यास ते इ. ११ वी कला/विज्ञान प्रवेशसाठी पात्र ठरतील.

तात्पुरता प्रवेश घेतल्यानंतर ऑगस्ट अखेर पात्रता अर्ज एच.एस.सी. बोर्डाकडे सर्व पूर्ततेसह सादर करावा.

**ब) इ. १२ वी कला / विज्ञान :-**

१. नव्या अभ्यासक्रमानूसार इ.११ वी कला/विज्ञान उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इ. १२ वी कला/विज्ञान वर्गात प्रवेश मिळेल.
२. प्रवेश देताना या महाविद्यालयातील इ. ११ वी कला/विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांना प्रथम प्राध्यान्य देण्यात येईल. त्यांनी अर्जासोबत साक्षांकित गुणपत्रकाची व दाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
३. या महाविद्यालयाच्या व्यतिरिक्त इतर ठिकाणाहून आलेल्या विद्यार्थ्यांना संबधीत शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्रक व गुणपत्रकाची सत्यप्रत तसेच वर्तणुकीचा दाखला प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
४. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्यासाठी प्रवेशामध्ये शासन नियमाप्रमाणे जागा राखीव आहेत. त्यासाठी मूळ दाखल्यावरील जातीची नोंद किंवा विद्यार्थ्यांच्या नावाने असलेला जातीचा दाखला ग्राहय धरण्यात येईल. इतर कोणत्याही आई-वडील किंवा नातेवाईकांचा जातीचा दाखला ग्राहय धरण्यात येईल.
५. खेळ, कलेसाठी शासन नियमाप्रमाणे जागा राखीव आहेत.
६. ४० % पेक्षा अधिक अंध व अपंग असणाऱ्या विद्यार्थ्यांच्यासाठी शासन नियमाप्रमाणे जागा राखीव आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**प्रवेश घेण्यापूर्वी करावयाची पूर्तता-**

१. प्रवेश अर्ज College website Onlineवर बिनचूक भरणे आवश्यक आहे.
२. प्रत्येक विद्यार्थ्यांने प्रवेश घेतेवेळी प्रवेश अर्जावर अलिकडील काढलेला स्वत:चा फोटो लावावा. तसाच दुसरा फोटो ओळखपत्रावर लावावा.
३. प्रवेश अर्जासोबत शाळा सोडल्याचा मूळ दाखला व साक्षांकित सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
४. अर्जासोबत गुणपत्रकाची मूळप्रत व सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
५. प्रवेश शुल्क (संपूर्ण वर्षाचे)प्रवेश घेतेवेळी ऑनलाईन संबंधित बॅंक शाखेत भरणे आवश्यक आहे.
६. कोणत्याही सबबीवर भरलेली फी परत केली जाणार नाही.
७. इ.बी.सी., बी.सी. सवलतधारक विद्यार्थ्यांनी कार्यालयीन सूचनेनुसार वेळेत कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

८. विद्यार्थी मागासवर्गीय असल्यास जातीचे प्रमाणपत्र, अपंग असल्यास अपंगत्वाचे प्रमाणपत्र, पालक माजी सैनिक, स्वातंत्र्यसैनिक असल्यास त्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

९. प्रवेश घेतेवळी आधारकार्डाची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.

१०. विद्यार्थी बी.पी.एल. कार्डधारक (दारिद्रय रेषेखालील) असल्यास त्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.

११. विद्यार्थ्यांने स्वत:चा व पालकांचा मोबाईल व्हाटसअप असलेला नंबर देणे आवश्यक आहे.

१२. प्रवेश घेतेवळी विद्यार्थ्यांने स्वत:हजर रहावे.

**कला शाखा-**

या महाविद्यालयात कला व विज्ञान या शाखेच्या शिक्षणाची सोय असून कला शाखेसाठी मराठी माध्यम आहे. कला शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, मराठी, पर्यावरणशास्त्र, शारीरिक शिक्षण व आरोग्य शिक्षण हे विषय सक्तीचे आहेत. याशिवाय त्यांना खालील वैकल्पिक विषयांपैकी चार विषय पूर्वनिर्धारीत ग्रुपनुसार घ्यावे लागतील.

१) हिंदी २) इतिहास३) भूगोल ४)अर्थशास्त्र५) राज्यशास्त्र६) मानसशास्त्र

**विज्ञान शाखा-**

विज्ञान शाखेत गुणवत्तेनुसारच प्रवेश देण्यात येईल. या शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना खालील विषय घ्यावे लागतील.

१)मराठी/आय.टी. २)इंग्रजी ३)भौतिकशास्त्र ४)रसायनशास्त्र ५)जीवशास्त्र ६)गणित/भूगोल ७) पीकशास्त्र (Crop Science)

पीकशास्त्र (Crop Sci.) आय.टी. व भूगोल या विषयांना महाविद्यालयातील उपलब्ध जागा विचारात घेऊनच गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. इ. ११ वी व इ. १२ वी विज्ञान वर्गासाठी पर्यावरणशास्त्र, शारीरिक शिक्षण व आरोग्य हे विषय सक्तीचे आहेत. इ. ११ वी विज्ञान वर्गासाठी शै. वर्ष २०१८-१९ पासून २०० गुणांचापीकशास्त्र विषय विनाअनुदानीत तत्वावर सुरू करण्यास मान्यता मिळालेली आहे. पीकशास्त्र (Crop Sci.)विषय घेतल्यावर गणित व मराठी हे विषय घेता येणार नाही.

**ग्रंथालय व अभ्यासिका :-**

कनिष्ठ महाविद्यालयाचे ग्रंथालय हे क्रमिक पुस्तके, संदर्भग्रंथ व विविध विषयांची नियतकालिके यांनी समृध्द् आहे.

अ) कनिष्ठ महाविद्यालयात प्रथम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शुल्क भरून ग्रंथालयातून ओळखपत्र घ्यावे व प्रवेश घेतल्यापासून १० दिवसाच्या आत ओळखपत्रावर स्वत:चा फोटो लावून प्राचार्यांची सही घ्यावी.

ब) ओळखपत्र दाखविल्यानंतरच विद्यार्थ्यांना ग्रंथालयातून पुस्तके अथवा नियतकालिके मिळतील.

क) विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेची खास स्वतंत्र अशी सुव्यवस्था केलेली आहे.

ड) ग्रंथालय व अभ्यासिकेसंबंधी सूचना फलकावर लावल्या जातात, विद्यार्थ्यांनी त्या काळजीपूर्वक पहाव्यात, सूचनांचे पालन न केल्यास कडक कारवाई केली जाईल.

इ) पुस्तक हरविल्यास, फाटल्यास अथवा खराबझाल्यास पुस्तकाची संपूर्ण किंमत भरावी लागेल.

ई) पुस्तक ठरलेल्या कालावधीतच जमा करावेत, उशीर झाल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल

**कनिष्ठ महाविद्यालय प्रवेश शुल्क - २०२०-२०२१**

| | | पेईंग विद्यार्थ्याच्यासाठी | | | | इ.बी.सी. व बी.सी. शिष्यवृत्तीधारक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | तपशील | ११ वी कला | १२ वी कला | ११ वी विज्ञान | १२ विज्ञान | ११ वी कला | १२ वी कला | ११ वी विज्ञान | १२ वी विज्ञान |
| १ | प्रवेश फी | १६ | १८ | १६ | १८ | | | | |
| २ | शिक्षण फी | १९२ | २१६ | १९२ | २१६ | | | | |
| ३ | टर्म फी | ३२ | ३६ | ३२ | ३६ | | | | |
| ४ | प्रात्यक्षिक फी | ० | ० | ७० | ७० | | | | |
| ५ | स्टुडंट एण्ड फंड | १० | १० | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ६ | ओळख पत्र | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| ७ | सत्र परीक्षा फी | २०० | २०० | ४०० | ४०० | २०० | २०० | ४०० | ४०० |
| | **एकूण** | **५००** | **५३०** | **७७०** | **८००** | **२६०** | **२६०** | **४६०** | **४६०** |

**प्रत्येक सत्राच्या सुरूवातीस भरावयाची वसतिगृह फी :-**

| **प्रथम सत्र** | | **दुसरे सत्र** | |
|---|---|---|---|
| **मुलांचे वसतिगृह** | | **मुलांचे वसतिगृह** | |
| प्रवेश फी | रू. १००/- | | |
| टर्म फी | रू. ३०००/- | टर्म फी | रू. ३०००/- |
| पाणी व लाईट चार्जेस | रू. १७००/- | पाणी व लाईट चार्जेस | रू. १७००/- |
| **एकूण** | **रू. ४८००/-** | **एकुण** | **४७००** |
| **मुलींचे वसतिगृह** | | **मुलींचे वसतिगृह** | |
| प्रवेश फी | रू. १००/- | | |
| टर्म फी | रू.३०००/- | टर्म फी | रू. ३०००/- |
| पाणी व लाईट चार्जेस | रू. १७००/- | पाणी व लाईट चार्जेस | रू. १७००/- |
| **एकूण** | **रू. ४८००/-** | **एकुण** | **रू. ४७००/-** |

- वसतिगृहांमध्ये शिस्तबध्द वर्तन असावे. गैरवर्तन केल्यास वसतिगृह प्रवेश रद्द केला जाईल.

**सायकल स्टॅन्ड फी :-**

१. सायकल रु. २५/- प्रती महिना

२. मोटार सायकल रु. ३०/-प्रती महिना

**सूचना :-**

१. शिक्षण फी प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी भरावी लागेल. मार्च, एप्रिल व मे महिन्याची शिक्षण फी मार्चमध्ये भरावी लागेल.

२. एकदा भरलेली फी कोणत्याही सबबीवर परत केली जाणार नाही. महाराष्ट्र शासनाकडून वेळोवळी विहीत केले जाणारे नियम विद्यार्थ्यांस बंधनकारक राहील.

३. महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा प्रवेश अंतिम समजला जाईल, जेव्हा कमिटी प्रवेशासंबंधीचा निर्णय जाहीर करील व कमिटीने घेतलेला निर्णय विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी स्वतंत्र यादीद्वारे फलकावर लावला जाईल, तेव्हा गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.

**सवलती व शिष्यवृत्त्या :-**

**अ)** ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे गतवर्षीचे वार्षिक उत्पन्न रु. २.५०००/-पेक्षा कमी आहे, असे विद्यार्थी आर्थिकदृष्टया मागास फी सवलतीस (इ.बी.सी.) पात्र आहेत. त्यांनी सदरच्या फी माफीचा अर्ज योग्य त्या पूर्ततेसह वेळेत सादर करावा.

**ब)**अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जमातीतील विद्यार्थ्यांना सरकारी नियमाप्रमाणे शिष्यवृत्ती मिळू शकेल.

**क)** स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यास सरकारी नियमाप्रमाणे फी सवलत मिळेल.

**ड)** इतर शिष्यवृत्ती व फी सवलती संबंधीत सूचना सरकारी आदेशानुसार वेळोवेळी फलकावर लावण्यात येतात, अशा शिष्यवृत्ती संबंधीत सूचनांची सर्व पूर्तता करणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील.

**इ)** वर्गातील ८०% उपस्थिती, अभ्यासातील समाधानकारक प्रगती व सुयोग्य वर्तन असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच या सवलतीचा फायदा मिळू शकतो.

**ई)** मुलींना मोफत शिक्षण महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक एफ.इ.डी. १०८/२५६४/६० शिक्षण ५. दि. ०२/०६/१९८५ नुसार इ. ११ वी व इ. १२ वीतील मुलींना फी माफ करण्यात आलेली आहे. सदर फी माफीचे अर्ज प्रवेश घेतल्यापासून १० जुलैच्या आत महाविद्यालयाच्या कार्यालयात योग्य त्या पूर्ततेसह संबंधीताने भरून देणे आवश्यक आहे.

**उ)** जातपडताळणी - (सर्व मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी) जातीची पडताळणी करून घेणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास होणाऱ्या नुकसानीस संबंधीत विद्यार्थी जबाबदार राहील.

**पारितोषिके :-**

१. **श्री. रामलाल गुलाटी स्मृती पारितोषिक -**हे पारितोषिक या महाविद्यालयातून इ. १२ वी परीक्षेत पास होणाऱ्या व फिजीक्स (पदार्थविज्ञान) या विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस देण्यात येते. (सदरहू पारितोषिक पात्र विद्यार्थी इंजिअरींग, मेडिकल अथवा तत्सम अभ्यासक्रमासाठी न गेल्यास पुढील शिक्षण त्याने या महाविद्यालयातून शास्त्र शाखेत पूर्ण करणे आवश्यक आहे.)

२. **कै.रामचंद्र भगवंतराव गिरमे पारितोषिक -**हे पारितोषिक या महाविद्यालयातून इ. १२ वी परीक्षेत पास होणाऱ्या व फिजीक्स (पदार्थविज्ञान) या विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस देण्यात येते. (सदरहू पारितोषिक पात्र विद्यार्थी इंजिअरींग, मेडिकल अथवा तत्सम अभ्यासक्रमासाठी न गेल्यास पुढील शिक्षण त्याने या महाविद्यालयातून शास्त्र शाखेत पूर्ण करणे आवश्यक आहे.)

३. **डॉ. शरदकुमार भा. आगाशे पारितोषिक -**हे पारितोषिक या महाविद्यालयातून इ. १२ वी विज्ञानमध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन मेरिटवर मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळविणाऱ्या अथवा मेडिकलला कोणालाच प्रवेश न मिळाल्यास शास्त्र शाखेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस देण्यात येते.

४. **कै. भार्गव कुरणावळ पारितोषिक -**कै. भार्गव महादेव कुरणावळ यांचे स्मृतिप्रित्यर्थ या महाविद्यालयात इ. १२ वी शास्त्र शाखेत परीक्षेत रसायनशास्त्र या विषयात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस देण्यात येते.

५. **महाविद्यालयाने ठेवलेली पारितोषिके -**इ. ११ वी व इ. १२ वी कला व शास्त्र शाखेत परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस महाविद्यालयातर्फे ५१/- रूपयांचे पारितोषिक देण्यात येते.

६. **रामविलास मादुराम सोमाणी पारितोषिक -**इ. १२ वी परीक्षेत पास होणाऱ्या व बायोलॉजी या विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस हे पारितोषिक देण्यात येते.

७. **चीफ केमिस्ट - श्री. बी.एन. जुवेकर पारितोषिक -**अ) हे पारितोषिक या महाविद्यालयामधून इ. १२ वी शास्त्र परीक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांस देण्यात येते. ब) हे पारितोषिक या महाविद्यालयात उत्तम खेळाडू विद्यार्थी किंवा विद्यार्थिनीस देण्यात येते.

८. **महिला मंडळ, श्रीरामपूर पारितोषिक -**मुलींसाठी प्रथम रू. ३००/-, द्वितीय रू. २००/-

अ) १) इ. १२ वी कला मुलींमध्ये सर्वप्रथम    २) इ. १२ वी कला मुलींमध्ये द्वितीय
ब) १) इ. १२ वी विज्ञान मुलींमध्ये सर्वप्रथम    २) इ. १२ वी विज्ञान मुलींमध्ये द्वितीय

९. विद्यार्थ्यांनी वसतिगृहामध्ये आदर्श विद्यार्थिनींसाठी कै.सौ. राधाबाई सोनाजी चौधरी पारितोषिक रू. १०१/- देण्यात येते.

**<u>वसतिगृहे - महत्त्वाच्या सूचना:-</u>**

१. विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी सर्व सोईनीयुक्त अशी स्वतंत्र आणि भव्य वसतिगृहे महाविद्यालय परिसरात असून वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांनी स्वतंत्र प्रवेश अर्ज योग्य त्या पूर्ततेसह भरणे आवश्यक आहे.

२. वसतिगृहातील विद्यार्थी, विद्यार्थिनींना वसतिगृहाच्या व महाविद्यालयाच्या कार्यक्रमात सहभागी होणे आवश्यक आहे. तसेच वेळोवळी वसतिगृह प्रमुखांच्या सर्व सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

३. वसतिगृहामध्ये, वसतिगृहाच्या आवारात, महाविद्यालय परिसरात संस्थेच्या, शाखेच्या प्रतिष्ठेस बाधा येईल, असे कोणतेही कृत्य करू नये.

४. वसतिगृह प्रमुखांच्या परवानगीशिवाय कोणत्याही विद्यार्थी, विद्यार्थिनींच्या पालकांना अगर अन्य व्यक्तीला वसतिगृहामध्ये राहता येणार नाही.

५. वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस वसतिगृहाच्या सर्व नियमांना अधिन राहूनच प्रवेश घ्यावा लागेल. वसतिगृह नियमांचे उल्लंघन झाल्यास प्राचार्य व अधिक्षक यांचा निर्णय अंतिम ठरविण्यात येऊन कारवाई करण्यात येईल.

६. विद्यार्थी व विद्यार्थिनींची जेवणाची व्यवस्था स्वत:च्या जबाबदारीवर असेल.

७. विद्यार्थी व विद्यार्थिनींची स्वत:कडील सर्व वस्तूंची जबाबदारी स्वत:कडे असेल.

८. इ. ११ वी विज्ञान वर्गातील विद्यार्थी व विद्यार्थिनींचे वसतिगृह प्रवेश उपलब्ध जागेनुसार गुणवत्तेवर दिले जातील.

**<u>जिमखाना विभाग-</u>**

महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी भव्य जिमखाना इमारत व मैदान उपलब्ध करून दिली आहे. तेथे देशी, विदेशी तसेच मैदानी खेळांचे साहित्यही उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारात सहभागी व्हावे, अशी अपेक्षा आहे.

**<u>एन.सी.सी.विभाग-</u>**

महाविद्यालयात कनिष्ठ विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी एन.सी.सी. उपलब्ध असून याद्वारे लष्करी शिक्षण, नेतृत्व या गुणांचा विकास व चारित्र्य संवर्धनासाठी राष्ट्रीय छात्रसेना विभाग कार्यरत आहे.

१. शारीरिकदृष्टया अव्यंग व आरोग्यदृष्टया निर्दोष असलेल्या विद्यार्थ्यांना वैद्यकिय तपासणीनंतर प्रवेश दिला जाईल.

२. एन.सी.सी.च्या कॅडेटस् एन.सी.सी.च्या नियमाप्रमाणे अधिकाऱ्यांच्या आज्ञेचे पालन करावे लागेल. तसेच सर्व परेडस्ला व कॅम्पस्ला हजर रहावे लागेल.

**एन.एस.एस. (राष्ट्रीय सेवा योजना) :-**

महाराष्ट्र शासनाने +२ स्तरावरील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये श्रम, स्वावलंबन व स्वयंशिस्त इ. गुणांचा विकास व्हावा या हेतूने राष्ट्रीय सेवा योजना सुरू केलेली आहे. इ. ११ वी व इ. १२वी कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना यामध्ये प्रवेश दिला जातो.

**कमवा व शिका योजना :-**

''कमवा आणि शिका योजना'' हे कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचे अविभाज्य अंग आहे. या योजनेनुसार रोज दोन तास महाविद्यालयाच्या प्रांगणात विविध प्रकारची कामे करून स्वावलंबनातून आपला अभ्यासक्रम पूर्ण करतात. त्यासाठी सहभागी विद्यार्थ्यांना मोबदला दिला जातो.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना :-**

१. प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्य सर्व विषयांच्या तासांना नियमितपणे व वेळेवर हजर राहिले पाहिजे. दररोजच्या सर्व तासांना विद्यार्थी हजर राहिल्यास तो त्या दिवशी हजर होता असे मानले जाईल. तसेच प्रत्येक सत्रात ८०% पेक्षा कमी दिवस उपस्थित असल्यास नियमानुसार विद्यार्थ्यांचे सत्र मंजूर होणार नाही व त्यास वार्षिक परीक्षेस बसता येणार नाही.

२. विद्यार्थ्यांने प्रत्येक सत्रातील स्वाध्याय, घटक चाचणी, सत्र परीक्षा, प्रात्यक्षिके व तोंडी परीक्षेस उपस्थित राहणे आवश्यक आहे.

३. विद्यार्थ्यांने महाविद्यालयाच्या परिसरात वावरतांना स्वत: जवळ महाविद्यालयाचे ओळखपत्र ठेवले पाहिजे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक यांनी मागितल्यास त्यांना ताबडतोब दाखविले पाहिजे.

४. कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांस आपली उपस्थिती, वर्तणूक व शिस्त याविषयीचे प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे लागेल.

५. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात वावरतांना खालील नियमांचे पालन काटेकोरपणे करावे.

**गणवेशासंबंधी-**महाविद्यालयाने इ. ११वी व इ. १२ वी कला व विज्ञान आणि व्होकेशनल कोर्स या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी खालील गणवेश निश्चित केलेले आहेत.

अ) इ. ११ वी व इ. १२ वी कलाच्या विदयार्थ्यांना प्रवेश घेते वेळी गणेवेशाची माहिती दिली जाईल. ११ वी व १२वी व्होकेशनल कोर्स या वर्गांसाठी मुलांसाठी नेव्ही ब्ल्यू पॅट व स्काय ब्ल्यू रंगाचा फूल बाहीचा शर्ट. **मुलींसाठी**पंजाबी ड्रेस-कुडता स्काय ब्ल्यू (स्लिवलेस नसावा) सलवार व ओढणी नेव्ही ब्ल्यू रंगाची असावी.

**ब)** विज्ञान शाखेतील इ. ११ वी व इ. १२ वी मुलांसाठी पॅट-कॉफी रंगाची व शर्ट-फूल बाहीचा बिस्कीट रंगाचा तर **मुलींसाठी**कुडता बिस्किट रंगाचा (स्लिवलेस नसावा)सलवार व ओढणी कॉफी रंगाची असावी. महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या गणवेशातच उपस्थित रहाणे अनिवार्य आहे.

६. महाविद्यालयाचे कामकाज, प्रतिष्ठा व शिस्त यांना बाधा येणार नाही असे वर्तन ठेवावे व वर्गात ग्रंथालयात, अभ्यासिकेत, परिसरात व सभागृहात शांतता राखण्याची काळजी घ्यावी.

७. महाविद्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान टाळावे. ज्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान अगर खराबझाल्याचे निदर्शनास येईल त्यासंबंधीत विद्यार्थ्यांकडून नुकसान भरपाई वसूल केली जाईल. तसेच वर्ग, प्रयोगशाळा, ग्रंथालय, अभ्यासिका, वसतिगृह, पुस्तके आदींमधील नुकसान अगर खराब झाल्याचे आढळल्यास व संबंधीत विद्यार्थ्यांचे नाव पुढे न आल्यास अशावेळी संबंधीत वर्गाकडून अथवा विद्यार्थ्यांच्याकडून सामुदायिक स्वरूपात नुकसान भरपाई वसूल केली जाईल.

८. महाविद्यालयातील सर्व घटकांच्याबरोबरचे विद्यार्थ्यांचे वर्तन सौजन्यशील असावे.

अ)महाविद्यालयाशी व संस्थेशी संबंधीत असलेली कोणतीही माहिती अथवा वृत्त प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय वृत्तपत्रामध्ये अथवा प्रसिध्दीसाठी देऊ नये.

ब) प्राचार्यांच्या पूर्व परवानगीशिवाय सूचना फलकावर कोणतीही सूचना अथवा भिंतीपत्रके लावू नये.

क) पुढील वर्षासाठी प्रवेश देतांना गतवर्षाची वर्तणूक विचारात घेऊन प्रवेश देणे अथवा न देणे प्राचार्यांच्या निर्णयावर अवलंबून राहिल.

ड) विविध परीक्षेच्यावेळी गैरवर्तन अगर कॉपी इ. प्रकार आढळून आल्यास जी कारवाई महाविद्यालय करील ती विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

ई) इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांची १५ फेब्रुवारीपर्यंतची उपस्थिती ८०%असणे (पुणे विभागीय मंडळाच्या नियमानुसार)आवश्यक आहे. परीक्षा फॉर्म भरल्यानंतर तो विद्यार्थी गैरहजर राहिल्यास त्याचे परीक्षा प्रवेशपत्र (अॅडमिट कार्ड) न देण्याचा अधिकार महाविद्यालयाचा राहील.

९. कनिष्ठ महाविद्यालयात स्नेहसंमेलन व निवडणूका होणार नाहीत. ज्यांना ही अट मान्य असेल त्यांनीच प्रवेश घ्यावा.

१०. विद्यार्थ्यांने गैरवर्तन केल्यास जसे एखाद्यास मानसिक, शारीरिक, अपंगत्वावर छेडछाड अशाप्रकारचे वर्तन केल्यास संबंधीत विद्यार्थ्यांस रॅगिंग अॅक्टखाली फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.

११. महाविद्यालय परिसरात कोणतेही तंबाखूजन्य पदार्थ खाण्यास अथवा धुम्रपान करण्यास व मोबाईल वापरण्यास सक्त मनाई आहे.

१२. शासकीय परिपत्रकाप्रमाणे विद्यार्थ्यांनी कोरोना प्रतिबंधक उपयोजनेचे काटेकोर पणे पालन करावे.

१३. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना ई-लर्निगंची सुविधा सुरू केलेले आहे.

**<u>पालकांसाठी महत्त्वाचे</u> :-**

विद्यार्थी, पालक आणि शिक्षक हे शिक्षण व्यवस्थेतील तीन महत्त्वाचे घटक आहेत. रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास व वर्तनाबरोबरच त्यांच्या सर्वांगिन विकास याबाबत महाविद्यालय प्रयत्न करीत असते. महाविद्यालयाच्या प्रयत्नांना यश मिळावे यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांनी खालील बाबींमध्ये सहकार्य करावे.

१. महाविद्यालयाच्या प्रत्येक सत्रान्वये स्वाध्याय, दोन घटक चाचण्या व दोन सत्र परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षा व तोंडी परीक्षा घेतल्या जातात. शारीरिक शिक्षण व पर्यावरण परीक्षा अनिवार्य आहेत.

२. आपल्या पाल्याचा अभ्यास, वर्तन तद्नुषंगिक बाबींबाबत प्राचार्यांकडून पत्र अथवा फोन आल्यास अगर स्वत:हून कार्यालयाच्या वेळेत प्राचार्यांना भेटल्यास ते विद्यार्थ्याच्या प्रगतीच्यादृष्टीने उपयुक्त ठरेल.

३. महाविद्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या पालक मेळाव्यासाठी पालकांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

४. पाल्याच्या हजेरी व गुणवत्ता वाढीबाबत शिक्षकांनापालकांनी महिन्यातून एकदा भेटावे व चौकशी करावी.

५. आपल्या पाल्यास कोरोना प्रतिबंधक साधन सामुग्री पुरवावी.

६. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना ई-लर्निगंची सुविधा सुरू केलेले आहे.

प्राचार्य,<br>
रा.ब.नारायणराव बोरावके महाविद्यालय,<br>
श्रीरामपूर.

रयत शिक्षण संस्थेचे,

**रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालय,**
**श्रीरामपूर, ४१३ ७०९ जि. अहमदनगर**

***महाविद्यालयाची ठळक वैशिष्टये***

## A+ नॅक मानांकन (C.G.P.A.3.44)

१. आशिया खंडातील सर्वात मोठया शिक्षण संस्थेची महत्त्वपूर्ण शाखा.
२. कर्मवीर अण्णाव राबवहादूर नारायणराव बोरावके या दोघांच्या स्नेहाची व शिक्षणप्रेमाची मूर्तिमंत साक्ष.
३. १२५ हून अधिक उच्च विद्याविभूषित प्राध्यापक, ६० हून अधिक कार्यतत्पर शिक्षकेत्तर सेवक वर्ग व ६००० हून अधिक ज्ञानमग्न विद्यार्थी.
४. अकरावीपासून ते पदव्युत्तर वर्गापर्यंत कला व विज्ञान या विद्याशाखांमधील शिक्षणाची सोय.
५. मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र, संगणकशास्त्र या विषयांची पदव्युत्तर अभ्यास केंद्र.
६. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे अभ्यास केंद्र.
७. मराठी व अर्थशास्त्र या विषयांचे एम.फिल व पीएच.डी.चे संशोधन अभ्यास केंद्र.
८. व्यावसायिक (तांत्रिक) केंद्राची सोय.
९. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र. (U.P.S.C./M.P.S.C.)
१०.अभियांत्रिकी व वैदयकिय प्रवेश पूर्व परीक्षा मार्गदर्शनपर वर्गांचे जादा तासांचे आयोजन
११. Digital class rooms
१२.विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी कमवा व शिका योजना, पुणे विद्यापीठाने गौरविलेला राष्ट्रीय सेवा योजना विभाग, छात्रसेना आदी अनेक उपक्रम.
१३.टाटा बिझनेस सपोर्ट सर्विसेस केंद्र.
१४.असंख्य ग्रंथांनी व नियतकालिकांनी समृध्द् ग्रंथालय.
१५.अद्ययावत शैक्षणिक साधनांनी व उपकरणांनी सुसज्ज प्रयोगशाळा.
१६.भव्य क्रीडांगण व सर्व प्रकारचे क्रीडा साहित्यांनी परिपूर्ण क्रीडा विभाग.

१७.संगणकशास्त्र पदवी व पदव्युत्तर अभ्यासकेंद्र व चोवीस तास इंटरनेट सुविधा.

१८.विद्यार्थी व विद्यार्थिंनीसाठी सर्व सोयींनीयुक्त वसतिगृहे.

१९.विद्यार्थी व विद्यार्थिंनीसाठी सर्व अभ्यास क्रमाची ई-लर्निंग सुविधा उपलब्ध.

२०.परिसरातील सावित्रीबाई फुले बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक विद्यालय व संस्कार केंद्र, चंद्ररूप डाकले जैन वाणिज्य महाविद्यालय, स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालय.

२१.डॉ . ए.पी.जे. अब्दुल कलाम वाचन कट्टा.

२२.देखण्या इमारतींनी, वृक्षवेलींनी नटलेला, सजलेला बेचाळीस एकराचा नयनरम्य परिसर.

२३.सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी व वैद्यकीय मार्गदर्शन केले जाते.

२४.महाविद्यालयाच्या परीसरात प्रवेश केल्यावर कोरोना प्रतिबंधक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.